## फेड कृष्णलालचा हिशोब नं. २१, तडजोड नं. २२, पावती नं. २३ व २४

२१७१--१३--० कृष्णलाल यास दहा वर्षांत दिलेलें व्याज.
६६---८--३ दहा वर्षांत दिलेल्या तीन दरखास्तींचा खर्च.
६२४७--८--३ कृष्णलालजीचे एकंदर देणें:
१२८०-४-० आत्माराम अनंत यांचें देणे.
४१२--५--६ अण्णासाहेब खरे यांचें देणें.
३५०--०--० काकासाहेब दीक्षित यांचें देणें.
८०--०--० नरोत्तम केशव यांचे देणे.
८३७०--१--९

पाचही सावकारांची फेड केली ती

२४८९--६--६ ठाणें डिस्ट्रिक कोर्टानें दिले ते
५२०५-१०-३ ट्रस्टींनीं दिले ते
६७५--१--० तडजोडीचे वेळीं कृष्णलालनें ट्रस्टीना सूट दिली ती
८३७०--१--९

## १७. कृष्णलालची पहिली १२०९--२--६ ची दरखास्त व दुसरी १२५४--४--३ ची दरखास्त

डिस्ट्रिक्ट कोर्टानें कृष्णलाल यांस त्याचे पहिले व्याजाचे व हुकुमनाम्याच्या खर्चाच्या दरखास्तीचे पोटीं ता. २५--१--२२ रोजीं रु. १२०९-२-६ दिल्या-नंतर व ट्रस्टींचे ताब्यांत मिळकत आल्यावर कृष्णलालकडून ट्रस्टीवर रक्कम रु. १२५४--४--३ ची दुसरी दरखास्त सन १९२४ चे आक्टोबर अगर नोव्हेंबर महिन्यांत देण्यांत आली.

## १८. अण्णासाहेब खरे यांजकडून आणलेली १९२३--२४ व २४--२५ सालच्या वसुलाची माहिती कागद नं. २६

श्रीयुत धुरंधर वकील यांजकडून आलेल्या ४५० रुपयांच्या रकमेंतून प्रोबेटच्या स्टँपाकरतां कोठी कीर्दीतून उसनवार घेतलेली ३०७ रुपयाची रकम कोठी कीर्दीस पुन्हा परत केल्यामुळे, व त्याच ४५० रुपयातून नेवाळे जमिनीचा सरकारधारा रु. १०१ भरला असल्यामुळें, व श्रीयुत अण्णासाहेब खरे यांजकडून मिळकतीचें १९२३--२४ सालचें उत्पन्न न मिळाल्यामुळे श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांचेजवळ कृष्णलालच्या दरखास्तीची एवढी मोठी रकम भरण्यास त्या वेळीं कांहींच साधन नव्हतें. म्हणून श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर व देव हे ता. १७--१२--२४ रोजीं डहाणूस श्रीयुत अण्णासाहेब खरे यांजकडे गेले. परंतु त्या वेळीं अण्णासाहेब खरे फार आजारी होते म्हणून अण्णासाहेबांच्याच परवानगीने अण्णासाहेब दाभोळकर व देव यांनीं अण्णासाहेबांच्या कारकुनाकडून वर लिहिलेल्या दोन सालच्या वसुलाची माहिती घेतली. त्यावरून अण्णासाहेबाकडे बरीच रकम वसूल आली होती असे कळले. वसूल आलेली रकम परभारे कृष्णलालचे दरखास्ती पोटीं भरावी असें काकासाहेबानीं अण्णासाहेबास पत्राने कळविले. याच माहितीचे टिपणावरून चिंचणीचे कूळ सुकट्या लक्ष्मण याने १९२३ सालचा मक्ता न दिल्यामुळे त्याचेकडून अण्णासाहेब खरे यांनीं रु. ५६--४--० ची प्रॉमिसरीनोट ता. ८--८--२४ रोजीं लिहून घेतली, असे समजलें. ती प्रॉमिसरीनोट अण्णासाहेब दाभोळकर याजकडे आल्यावर त्यांनीं ती तिच्या वसुलाकरतां श्री. शेट नरसीलाल हरीलाल यांचकडे पाठविली. नरसीलाल यांनीं या रकमेपैकीं कांहीं रकम वसूल केली आहे.

## १९. दुसरे दरखास्तीची नोटीस कागद नं. २७, २८, २९.

कृष्णलालच्या १२५४-४-३ च्या दरखास्तीची भरपाई मुदतींत होत नाहीं असें पाहून डहाणू कोर्टानें नेवाळे येथील जमीन विक्रीची नोटीस कै. श्रीयुत काकासाहेब दीक्षित यांजकडे ता. ८-१-२५ रोजीं पाठविली. नंतर काका-

साहेब यांनीं श्रीयुत खरे यांना व श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांनीं शेट नरसीलाल यांना मिळकतीच्या उत्पन्नांतून त्यांजकडे आलेल्या रकमा परभारें डहाणू कोर्टांत भराव्या म्हणून लिहिले.

## २०. १२८४-४-३ पैकीं १२१४-०-० भरले श्री खरे यांची यादी कागदनं. १७; शेट नरसीलाल यांची यादी कागद नं. ३० दोन करार कागद नं. ३१, ३२

त्याप्रमाणें श्रीयुत अण्णासाहेब खरे यांनीं अण्णाचे खात्यांत त्यांची येणें असलेली बाकी रु. ४१२-५-६ आलेले १३०२ रुपये वसुलांतून कापून घेऊन बाकीची रकम रु. ८८९ ची ता. ३०-१-२५ रोजीं व पंढरीनाथकडून आलेल्या १९६ रुपयापैकीं व बाभूळ व ईंजायली झाडोऱ्याच्या विक्रीची रकम रु. २५१ पैकी रु. १५० ता.२९-३-१५ रोजीं व रु.१०० ता.१९-८-२५ रोजीं डहाणू कोर्टांत परभारे भरले व श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांना कळविलें. तसेंच शेट नरसीलाल यांनीं त्यांजकडे त्या वेळीं आलेला खिचणी जमिनीचा वसूल रु. ७५ ता. १-३-२५ रोजीं परभारे डहाणू कोर्टांत भरला. व श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांना कळविले. नंतर आगष्ट १९२५ महिन्यांत शेट नरसीलाल यांनीं मोरु पदमण व सुकट्या लक्ष्मण यांचे एक साली करार लिहून घेतले.

## २१. नेवाळें जमिनींतील गवताचा लिलांव मोरेश्वर भीमाचा करार नं. ३३

नंतर जुलई १९२५ महिन्यांत श्रीयुत दीक्षित, दाभोळकर व देव हे नेवाळें गांवचे गवती जमीनींतील गवताचा लिलाव करण्याकरितां व जमल्यास नेवाळें गांवची सर्व खरीप व गवती जमीन एखादे चांगले व खात्रीचे इसमास शेट नरसीलाल यांचे विचारें तीन सालचे करारानें लागवडीस देण्याकरतां वाणगांव येथें गेले. शेट नरसीलाल यांचे बंगल्यांत गवताचा लिलाव झाला. गवताचा भाव फारच उतरला असल्यामुळें शेवटची मागणी १५१ रुपयाची झाली.

सर्वानुमते तीं मंजूर करण्यांत आली. शेट नरसीलाल यांनीं ती रक्कम आगष्ट महिन्यांत वसूल करून ता. १०-८-२५ रोजीं श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविली.

नेवाळें येथील भात व गवती जमीन मोरेश्वर भीमा पाटील राहाणार कोलवलीचा पाडा कोटीम यास दरसाल खंड रु. ८०० घेऊन, १९२६ सालापासून तीन वर्षें मक्त्याने देण्याचे त्याच वेळीं सर्वानुमते ठरले. श्रीयुत काकासाहेबांनीं मोरेश्वर याचा एक साली करार लिहून घेऊन पाठवावा म्हणून शेट नरसीलाल यांना सांगितले. त्याप्रमाणें शेट नरसीलाल यांनीं मोरेश्वराचा, मोरु पदमणचा, सुकट्या लक्ष्मणाचा अशा तिघांचे एक सालीं करार सन १९२६ सालाकरतां घेतले, व श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविले. मोरेश्वर भीमास वरील जमीन देण्याचे ठरविते वेळीं आणखीही दोन चार इसम त्या जमीनीची मागणी करण्याकरतां आले होते. परंतु त्यापैकीं कोणीच ८०० रु. ही देण्यास कबूल होईना. म्हणून मोरेश्वर यासच ८०० रु. कराराने दिली.

## २२. ४०-४-३ ची पुरवणी दरखास्त नोटीस कागद नं. ३४

वरील दरखास्तीचे हकीकतीवरून असे लक्षांत येईल कीं, ह्या दरखास्तीचे रकमेपैकीं १२१४ रुपयांची भरपाई झाली व बाकी ४०-४-३ इतकी राहिली या बाकीकरतां कृष्णलालने ता. १३-१०-२५ रोजीं डहाणू कोर्टांत ट्रस्टीवर पुन्हा एक पुरवणी दरखास्त दिली. श्रीयुत पंढरीनाथ आत्माराम बावरे यांनीं नेवाळें येथील २ कुळांकडून वसूल केलेली सर्व रक्कम श्रीयुत अण्णासाहेब खरे यांजकडे किंवा अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे भरली नव्हती. त्यामुळें पुरवणी दरखास्तीची वर लिहिलेली रकम भरण्यास त्याचेजवळ मुळींच पैसे नव्हते.पैसे भरल्यावांचून सुटका नाहीं. कारण कृष्णलालनें या रक्कमेकरतां जमीन विक्रीची मामलतदार माहीम मार्फत नोटीस काढिली होती. म्हणून अण्णासाहेब दाभोळकर यांनीं शिरडी संस्थानच्या कोठी कीर्दीनून १५० रुपये ता. ५-६-२५ रोजीं उसनवार घेऊन ती रक्कम श्रीयुत अप्पासाहेब करंदीकर यांजकडे या कामा-

करता ॲड्व्हान्स म्हणून त्याच तारखेस डहाणू येथे पाठविली (ता.५-७-२५ च्या शिरडी संस्थानच्या सभेंतील ठराव पहा ) या रकमेपकीं इतक्या रकमेची जरूर नसल्यामुळे आप्पासाहेबानीं रु. ५० ता. ३०-५-२५ रोजीं परत पाठविले व ता. ९-११-२५ रोजीं डहाणू कोर्टांत रु. ४०-४-३ भरून १२५४-४-३ च्या दरखास्तीची पूर्ण भरपाई केली. या १५० रुपयाच्या ॲडव्हान्सपैकीं अप्पासाहेब करंदीकर याजकडे फक्त रु. ५९-११-९ शिल्लक राहिले.

## २३. ट्रस्टींनीं कै. काकासाहेब दीक्षित यांचें देणें दिलें.

शेट नरसीलाल यांजकडून नेवाळें गांवच्या गवती जमीनींतील गवताच्या सन १९२५-२६ सालच्या लिलांवाची ता. १०-८-२५ रोजीं जी ३५१ रुपयाची रकम अण्णासहेब दाभोळकर यांजकडे आली तिच्यापैकीं रुपये ३५० सर्व ट्रस्टींच्या संमतीनें आण्णाचे देण्याबद्दल श्रीयुत कै. काकासाहेब दीक्षित यांना ता. ३०-११-२५ रोजीं देण्यांत आले.

## २४. वेढे जमीनीबद्दल आत्माराम यास नोटीस कागद नं. ३५

श्रीयुत कै. काकासाहेब दीक्षित यांनीं सर्व ट्रस्टींच्या वतीनें मेसर्स दीक्षि माणेकलाल आणि कंपनी मुंबई या नांवानेचालणाऱ्या सॉलिसिटर्सकडून ता. १-१-२६ रोजीं श्री. आत्माराम अनंत बावरे यांना नोटीस दिली कीं, आण्णाचे मृत्युपत्रावरून वेढेगावचे जमीनींत अण्णाचा हिस्सा आहे असे दिसते. त्या जमीनीची व्यवस्था तुम्ही पाहातां. अण्णा मयत झाल्यापासून अण्णाच्या हिश्शाचा मक्ता नोटीसीचे तारखेपर्यंत तुम्ही ट्रस्टींना दिला नाहीं. व तुम्हांकडे ट्रस्टींचें त्यासंबंधानें किती घेणें आहे याबद्दल ट्रस्टींना हिशोबही दिला नाहीं, तरी ही नोटीस पोंचल्यापासून अण्णाच्या हिशोबाचे देणें ट्रस्टींना एक आठवडयाचे आत हिशोबासह द्यावे.

## नोटीसीचा आत्मारामकडून जबाब कागद नं. ३६

या नोटीसीचा जबाब आत्माराम अनंतचे वकील श्रीयुत प्राणजीवन मोतीलाल दलाल यांनीं ता. २२-१-२६ रोजीं असा दिला कीं, ट्रस्टींनीं दिलेली

नोटीस त्यांचे अशीलास कबूल नाहीं व बंधनकारकही नाहीं. शिवाय ते आजारी असून त्यांचे वडील चिरंजीव पंढरीनाथही आजारीच आहेत.

## आत्माराम यास पुन्हा नोटीस कागद नं. ३७

यानंतर ट्रस्टींनीं आत्माराम अनंत यास ता. २३-३-२६ रोजीं श्रीयुत आपासाहेब करंदीकर वकील मार्फत दुसरी नोटीस दिली. त्या नोटीसीचा जबाब आत्मारामकडून आजपावेतों मुळींच आला नाहीं. हल्लीं आत्माराम व पंढरीनाथ हे दोघेही मयत आहेत.

## २५. नेवाळें जमीनीचा धारा.

श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांनीं नेवाळें जमीनीचा धारा भरण्याकरतां कोठी कीर्दीतून ता. १६-४-२६ रोजीं रुपये ५० उसनवार घेऊन त्याच तारखेस रु. १०१ माहीम मामलेदार यांजकडे पाठविले.

## अण्णास असलेलें नरोत्तम केशवचे देणें. ट्रस्टींनीं हें देणें रु. ८० दिले. नं. १८

नंतर अण्णासाहेबांनीं श्रीयुत नरोत्तम केशव यानें अण्णाविरुद्ध वजावलेले डिक्रीची उसनवार रकम भरण्याकरतां कोठी कीर्दीतून पुन्हा ता. ३०-४-२६ रोजीं रुपये ८० घेतले व ते त्याच तारखेस श्रीयुत कै. काकासाहेब दीक्षित यांना श्रीयुत नरोत्तम केशव यांस देण्याकरितां दिले. ही डिक्री केव्हां व कोठें झाली व नरत्तोम केशव हे कोठचे राहणारे याची सर्व माहिती कै. काकासाहेब दीक्षित यांना होती असें दिसतें. नरोत्तम केशवचें नांव ट्रस्टींनीं प्रोबेट मिळण्याकरतां जो ता. २८-२-२१ रोजीं डिस्ट्रिक्ट कोर्टांत अर्ज केला आहे त्यांत नाही. ट्रस्टींना त्या वेळीं नरोत्तम केशवचें नांव कळलें नसेल. कै. काकासाहेबांनीं त्यास देण्याकरतां ज्या अर्थी अण्णासाहेबांकडून रु. ८० घेतले त्या अर्थी त्यांना या देण्याची पूर्ण माहिती असली पाहिजे हें उघड दिसतें.

## २६. कर्जापोटीं रु. २०० कृष्णलाल यास दिले. पावती नं ३८

श्रीयुत आपासाहेब करंदीकर यानीं नेवाळे येतील कुळाकडून श्रीयुत पंढरीनाथ यानें जी कांहीं १९२३-२४ व २४-२५ सालची बाकी वसूल केली होती व जी त्याने श्रीयुत अण्णासाहेब खरे यांजकडे भरली नव्हती व जी कांहीं त्या कुळाकडे शिल्लक राहिली होती, त्यापैकीं कांहीं बाकी पंढरीनाथाकडून (रु. १४६) व रु, १५१-१२-० कुळाकडून वसूल केल्यापैकीं व त्याच्याकडे ॲडव्हान्स असलेल्या १५० रुपायापैकीं, व त्याजकडे ता. ९-६-२६ रोजीं श्रीयुत अण्णासाहेब खरे यानी अण्णाच्या खात्यापैकी. पाठविलेल्या रु. ४८-२-६ शिलके पैकीं रुपये ता. ४-७-२६ रोजीं आपासाहेब करदीकर यांनीं कृष्णलालचे कर्जापोटीं ट्रस्टींच्या सांगण्यावरून कृष्णलाल यास दिले व त्याची पावती घेतली नंतर शिलक राहिलेल्या रकमेपैकीं ४५-४-० कोर्टाचे कामी खर्च करून रु. १५० ता. ११-९-२७ रोजी अण्णासाहेब दोभोळकर यांजकडे पाठविले.

## २७. नेवाळे येथील कुळाकडून घेतलेल्या प्रॉमीसरी नोटी एका कुळावर फिर्यादचा कागद नं. ३९

श्रीयुत आपासाहेब करंदीकर यांनीं नंतर पंढरीनाथाकडील बाकी वसूल केली व ज्या कुळाकडे बाकी थकलेली होती त्या कुळाकडून प्रॉमीसरी नोटा लिहून घेतल्या त्यापैकीं एका कुळावर म्हणजे वामन भिवा राऊळ वर उहाणू कोर्टांत फिर्याद करून रु. ६५-६ खर्चासह हुकूमनामा मिळविला. रकम वसूल करण्याची व्यवस्था केली पण घरात कांहीं मालमिळाला नाहीं.

## २८. कर्जापोटी कृष्णलाल यास ४००रु दिले.पावती कागद नं.४०

शेट नरसीलाल यांजकडे १९२५ २६ सालच्या नेवाळें जमीनीच्या उत्पन्नाच्या आलेल्या पहिल्या हप्त्याची रकम रु. ४०० ट्रस्टींचे सांगण्यावरून नरसीलाल शेट यानीं कृष्णलालचे कर्जापोटीं ता. १-९-२६ रोजीं कृष्ण-

लाल यास देऊन त्याची पावती घेतली. व ही गोष्ट श्रीयुत आण्णासाहेब दाभोळकर यांना कळविली. नंतर अण्णासाहेबांच्या विनंतीवरून शेट नरसीलाल यांनीं १९२७ सालाकरता चिंचणी व नेवाळें येथील कुळाच्या एक साली कबुलायती १९२७ च्या ऑगष्ट महिन्यांत लिहून घेतल्या.

## २९.नेवाळें व चिंचणी जमीनींचा धारा.

### कृष्णलाल यांस कर्जापोटीं रु. ४०८--०--६ दिले. पावती नं. ४१

नंतर शेट नरसीलाल याजकडे ता.२७-१२-२६ रोजीं रु.१२०-१२-० ता. १-३-२७ रोजीं रु. ९ व ता. २-३-२७ रोजीं रु. ४०० अनुक्रमें चिंचणी भातजमीनीच्या १९२३ व २५ व २६ सालच्या उत्पन्नाचे बेडे विक्रीचे व नेवाळें जमिनीच्या १९२६ सालच्या उत्पन्नापैकीं दुसऱ्या हप्त्याचे आले त्यापैकीं रु.१०१ नेवाळे जमीनीचा धारा व रु. १३-७--६ चिंचणी जमीनीचा धारा अनुक्रमें ता.८-१-२७ व २५-२-२७ रोजीं त्यांनी भरला. रु.४००-०-६ कृष्णलाल यास ता. ७-६-२७ रोजीं देऊन त्याची पावती घेतली व अण्णासाहेब दाभोळकर यांना कळविलें.

### ३०.(१) कृष्णलालचा हिशोब कागद नं.२१ (२) तडजोड कागद नं.२ (३) रजिस्टर पावती नं २३. (४) साधी पावती नं. २४. (५) कोर्टाकडे अर्ज कागद नं. ४२. (६) निकाल झाल्याबद्दल कोर्टाकडून घेतलेला दाखला कागद नं. ४३.

श्रीयुत कृष्णलाल यांचे कर्ज फिटण्यास उत्पन्नाच्या मानाने बरींच वर्षे लागणार व त्यास विनाकारण व्याज भरावें लागणार यापेक्षां कांहीं तडजोड करून व जरूर तर शिरडी संस्थानच्या कायम फंडातून अण्णाचे ट्रस्टीना कर्जाऊ रक्कम दिली तर कृष्णलाल खात असलेलें व्याज शिरडी संस्थानकडे जाईल असे श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर व देव यांना वाटून त्यांनीं सन १९२७ च्या जून महिन्यांत श्रीयुत अप्पासाहेब करंदीकर यांना कृष्णलालचे हिशोब मागविण्यास सांगितले. कृष्णलालचे हिशोब लवकर येत नाहींत असे पाहून अण्णासाहेब

त्र नांनी आम्ही अमूक तारखेस मल्याणास येतो. त्या वेळीं तेथें कृष्णलाल यास हिशोब घेऊन हजर राहाण्यास सांगावे असें पत्र १९२७ चे आगष्ट महिन्यांत अप्पासाहेब करंदीकर यांना लिहिले. नंतर अण्णासाहेब व देव हे ता ८ किंवा ९ सप्टेंबर १९२७ रोजीं मल्याण येथे श्रीयुत जनुभाऊ ऊर्फ आण्णासाहेब करंदीकर यांचे घरीं गेले. दुसरे दिवशीं कृष्णलालचे वतीनें त्याचा भागीदार वृन्दावन हिशोब घेऊन तेथे आला. अप्पासाहेब करंदीकर यांनीं हिशोब तपासून पाहिला. नंतर तडजोड करण्याकरता अण्णासाहेब, आप्पासाहेब व देव हे चिंचगीस गेले. शेट नरसीलाल यांचे बंगल्यांत त्या रात्रीं तडजोड झाली. त्या तारखेस कृष्णलालची बाकी रु. २७७६--६--६ निघाली. या कर्जांचे पोटीं अण्णाची तिन्ही गावची जमीन कृष्णलालकडे गहाण होती. सर्वानुमतें कृष्णलाल याने २१०१ ) रुपये घेऊन मिळकत गहाणांतून मुक्त करून घ्यावी असें ठरलें. ही रक्कम ट्रस्टींनीं त्या तारखेपासून २ महिन्यांत कृष्णलाल यास द्यावी. व तसे न झाल्यास करार रद्द समजावा असे ठरले. दुसरे दिवशीं करार लिहिला. नंतर अण्णासाहेब, देव व आप्पासाहेब आपआपल्या गांवीं निघून गेले.

नंतर ही तडजोडीची हकीकत ट्रस्टीचे जामीन श्रीयुत मगनलाल नथुराम दवे यांना कळली व आपणही २१०१ रुपयांची रकम परभारें ३ सद्‌गृहस्थांकडून गोळा करून तिचा विनियोग अण्णाची मिळकत गहाणांतून मुक्त करण्याचेच कामीं लागली पाहिजे अशा अटीवर शिरडी संस्थानचे कायम फंडापैकीं, देण्यास कबूल आहों, तरी या अटीवर आपण ही रकम घेण्यास कबूल आहां का म्हणून शिरडी संस्थानचे ट्रस्टींना लेखी विचारले. संस्थान ट्रस्टींनीं त्याप्रमाणें कबुली दिल्यावर श्रीयुत दवे यांनीं ती रकम तीन सद्‌गृहस्थांकडून वसूल करून आगष्ट १९२७ महिन्यांत श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविली. शिरडी संस्थान ट्रस्टींना व अण्णाच्या ट्रस्टींना वरील अट मान्य होऊन त्याजकडून ती रकम आभारपूर्वक स्वीकारण्यांत आली. नंतर ती रकम ता. १४-१०-२७ रोजीं १००१, ता. १८-१०-२७ रोजीं १००१ व ता. ३१-१०-२७ रोजीं १२५ ह्याप्रमाणें २१२७ रु. शिरडी संस्थानचे कायम फंडास जमा

करून त्यापैकीं रु. २१०१ कृष्णलाल यास देण्याकरतां शिरडीसंस्थानचे हिशो बांत ता. ३१–१०–२७ रोजीं खर्च घालून अण्णाचे ट्रस्टींना कर्ज म्हणून ता. ३१–१०–२७ रोजीं देण्यांत आली. ता. ६ व ७ ऑक्टोबर १९२७ चे शिरडी संस्थानचे सभेतील ठराव पहा. नंतर ठरल्याप्रमाणें श्रीयुत अण्णा साहेब दाभोळकर हे ती रक्कम घेऊन श्रीयुत आपासाहेब करंदीकर व देव यांचे बरोबर चिंचणीस गेले. ही सर्व मंडळी नरसीलाल हरीलाल यांचे वाडींत उतरली व पैसे आणिल्याबद्दल त्यांनीं कृष्णलाल यांस कळविले. कृष्णलाल, वृन्दावन व इतर सभ्य गृहस्थ नरसीलाल शेटचेबरोबर वाडींत आले. ट्रस्टीसारखी मंडळी पैसे देणारी मिळाली म्हणून कृष्णलालचे कर्जाचा निकाल लवकर लागला तरी शिरडी संस्थानचे कायम फंडास कृष्णलाल यांनीं स्वसंतोषानें व उदार अंतःकर णानें चांगली देणगी द्यावी असे श्रीयुत दाभोळकर व देव यांनीं तेथे जमलेल्या सर्व मंडळीस सुचविल्यावरून कृष्णलालने शिरडी संस्थान कायम फंडास रु. १०१ देण्याचें कबूल केले.

दुसरे दिवशीं श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर, आपासाहेब करंदीकर, देव कृष्णलाल व वृंदावन हे डहाणूस गेले. अण्णासाहेब यांनीं २१०१ रुपयांची रक्कम कृष्णलाल यास सब रजिस्टर समक्ष ता. ३१-१०-२७ रोजीं दिली. कृष्णलाल व वृंदावन यांची पावती घेऊन ती रजिस्टर करून घेतली. कृष्णलालचे आणखी दुसरे तीन भागीदार त्या वेळीं हजर नव्हते. ते मागाहून आले. नंतर त्या पांचजणांची मिळून आणखी दुसरी एक पावती (रजिस्टर न करता) त्याच दिवशीं घेतली.

हें सर्व झाल्यानंतर कृष्णलाल यानीं त्या रकमेंतून रु. १०१ अण्णासाहेबांना सब रजिस्टर समक्ष शिरडीसंस्थान फंडास त्याच दिवशीं व त्याच वेळीं दिलें. या उदार देणगीबद्दल संस्थान ट्रस्टी व अण्णाचे ट्रस्टी कृष्णलालचे आभारी आहेत.

कृष्णलालचे हुकूमनाम्याची वर लिहिल्याप्रमाणे आपसांत फेड होऊन नेवाळे वेढे व चिंचणी येथील जमीन कृष्णलालचे गहाणातून मुक्त झाली. व दावा दाखला डहाणू कोर्टाचे दप्तरीं ठेवण्याकरतां डहाणू कोर्टास अर्जानें कळविण्यात

बद्दल श्रीयुत दाभोळकर व देव यांनीं श्रीयुत कृष्णलाल यास सुचविलें कृष्णलाल यांनीं त्याच दिवशीं म्हणजे ता. ३१-१०-२७ रोजीं लागलींच त्याप्रमाणे डहाणू कोर्टाकडे अर्ज केला.

नंतर ट्रस्टींचे दप्तरी राहाण्याकरता या दाखल्याची नकल मिळण्यासाठीं डहाणू कोर्टाकडे अर्ज करावा असें श्रीयुत दाभोळकर व देव यानीं अप्पासाहेब कांदीकर यांना सांगितल्यावरून त्यांनीं त्याप्रमाणे अर्ज करून ता. २२-१२-२७ रोजीं डहाणू कोर्टातून नकल घेतली व ती श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविली.

शिरडी संस्थानचे जें रु. २१०१ चे कर्ज अण्णाचे ट्रस्टींना दिलें आहे त्याच्या व्याजाचा दर अद्याप ठरला नाहीं. तो शिरडी संस्थानचे ट्रस्टींचे सभेंत ठरवून घेऊन त्याप्रमाणे अण्णाचे मिळकतींचे उत्पन्नांतून दरसालचा सरकार धारा वजा जाऊन बाकीच्या रकमेंतून व्याज मुदलाचा जमाखर्च ता. ३१-१०-२७ पासून शिरडीसंस्थानचे व अण्णाच्या मिळकतीच्या हिशोबाचे चोपडयांत करण्याची तजवीज ठेवली आहे. येत्या आषाढ शुद्ध पौर्णिमेस म्हणजे श्रीबाबांचे गुरुपौर्णिमेच्या पुण्य दिवशीं हा योग आल्यास फारच उत्तम.

## ११. नेवाळें जमिनीच्या मक्तयाचा वसूल नेवाळें व चिंचणी जमीनीचा सरकारधारा १९२७ सालचा. कागद नं. ३०

नेवाळें जमिनीच्या १९२७ सालच्या मक्तयाबद्दल रु ८०० ता. १४-२-२८ रोजीं ४०० व ता. १०-६-२८ रोजीं ४०० याप्रमाणें मोरेश्वर भिमाकडून आलेल्या उत्पन्नाच्या रकमेतून शेट नरसीलाल यांनीं ता. ३-३-२८ व ता. १२-३-२८ रोजीं अनुक्रमें रु. १३-७-६ व रु. १०१ चिंचणी व नेवाळे जमिनीचा सरकारधारा भरून बाकी राहिलेली रकम रु. ६८५ (रकम पाठविण्याचा खर्च वजा करून) ता. १२-६-२८ रोजीं अण्णासाहेब दाभोळकर यांजकडे पाठविले. नंतर चिंचणी व नेवाळे कुळाकडून एकसाली करार आगष्ट १९२८ महिन्यांत करून घेतले.

### ३२. नेवाळें व चिंचणी जमीनीचा १९२८ सालचा धारा. चिंचणी जमीनीचा वसूल कागद नं. ३०

चिंचणीच्या भातजमिनीच्या कुळाकडून १९२७ सालचा थकलेला सर्व मक्ता व १९२८ सालचा कांहीं मक्ता याप्रमाणे शेट नरसीलाल यांजकडे ता. ६--११--२८ रोजीं आलेल्या ८१ रुपयापैकीं, सर्व रकम व स्वतःच्या पदरची कांहीं रकम मिळून नरसीलालशेट यानीं ता. २५--१२--२८, ता. ५-१-२९ व ता. २०-१-२९ रोजीं नेवाळे व चिंचणी जमीनीचा धारा अनुक्रमें रु. ५१-०-३, १३-७-६ व ५० भरला. व ही गोष्ट श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर याना कळविली.

### ३३. वेढयाच्या जमीनीची पहिली चौकशी

श्रीयुत आत्माराम अनंत बाबरे यांना वेढयाच्या जमीनींतील अण्णा मयत झाल्यापासून त्यांच्या हिश्शाचे स्वामित्व ट्रस्टीकडे पाठवावे म्हणून १९२६ सालीं दोन नोटिसा दिल्या. नंतर त्या जमिनीसंबंधानें गांवचा नमुना नं. ७ व १२ या दोन कागदाचे उतारे श्रीयुत अप्पासाहेब करंदीकर मार्फत वेढयाचे तलाठीकडून १९२६ व २७ सालीं रेकॉर्ड पुन्हा लिहिल्यावर पुन्हां त्या कागदांचे उतारे अण्णासाहेब दाभोळकर यांनीं घेतले. १९२५--२६ व २७ हीं तीन वर्षे कृष्णलाल मनोरदासचे कर्जाची फेड करण्याच्या धामधुमींत गेलीं असल्यामुळे वेढयाच्या जमीनीकडे वर लिहिल्यापेक्षा जास्त लक्ष देतां आलें नाहीं. तथापि श्रीयुत आण्णासाहेब खरे व आप्पासाहेब करन्दीकर याचे मार्फत आत्माराम अनंत बाबरे वारले तरी पंढरीनाथ हयात असेपर्यंत वेढयाच्या जमीनींतील अण्णाचे हिश्शाच्या उत्पन्नाबद्दल सारखी चौकशी सुरू होतीच. असो या जमीनीबद्दल पुढे सविस्तर माहिती येणार आहे म्हणून आतांच जास्त लिहीत नाहीं.

### ३४. आजारीपणा, मुंबईचा दंगा व प्लेग यामुळें वसुलास आलेली हरकत.

श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांनीं मोरेश्वर भिमाकडून १९२८ सालचे नेवाळें जमीनीचे मक्त्याचे रुपये ८०० वसूल करून पाठवावे म्हण

शेट नरसीलाल यांना बरेच वेळां लिहिलें; परंतु त्यांच्या अत्यावस्थ आजारीपणामुळें व मुंबईतील दंग्यामुळें त्याजकडून पैसे आले नाहींत. म्हणून मार्च १९२९ महिन्यांत श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर व देव हे वाणगांवीं गेले. परंतु त्याही वेळीं रुपये मिळाले नाहींत. शेट नरसीलाल याना मोरेश्वरकडून ते पैसे लवकर वसूल करण्याकरतां, तसेंच सुकट्या व मोरू पदमण याजकडे थकलेली अनुक्रमे प्रॉमिसरी नोटीची व वाडीची बाकी वसूल करण्याकरतां विनंती करून अण्णासाहेब व देव हे परत गेले त्यावेळीं चिंचणास प्लेग असल्यामुळे मोरू पदमण व सुकट्या हे कोठे राहावयास गेले हें कोणासच माहीत नव्हते. त्यामुळे त्यांच्याकडील बाकाही वसूल करता आली नाहीं. मोरेश्वर भिमा सुमारे २ महिने आजारी होता. मुंबईस दंगा असल्यामुळे व गवताचे व्यापारी मुंबई सोडून बाहेरगांवीं गेले असल्यामुळे व चिंचणीस सुमारें ३ महिने प्लेग असल्यामुळे १९२८ सालचे वसुलास फारच हरकत आली.

## ३५. मोरेश्वर भिमाचे नवे करार सर्व ट्रस्टीची समती नं. ४४ वेढे गांवची माहिती.

श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर व देव हे पुन्हां एप्रिल १९२९ महिन्यांत वाणगांवीं गेले व नेवाळें येथील जमीन शेट नरसीलाल यांच्या संमतीनें पुन्हा मोरेश्वर भिमा यास दरसाल रु. ९५१ घेण्याच्या करारानें तीन वर्षे लागवडीस देण्याचे ठरलें. या वेळीं पूर्वीप्रमाणे सदर जमीन लागवडीस मागणेकरता २-३ दुसरे इसम श्रीयुत अण्णासाहेब खरे व आप्पासाहेब करंदीकर यांचे मार्फत वाणगांव येथें नरसीलाल शेट याचे बंगल्यावर व अण्णासाहेब दाभोळकर यांचे घरीं वांद्रें येथें आले होते. परंतु मोरेश्वर भिमापेक्षां जास्त देण्याची कोणाचीच इच्छा नसल्यामुळे सर्व ट्रस्टींच्या संमतीनें मोरेश्वर भिमासच ती जमीन ९५१ रुपये घेण्याच्या करारानें तीन वर्षे देण्याचें ठरले. मोरेश्वर भिमाकडून स्टँपकागदावर तीन वर्षांचा करार लिहून घेण्याकरतां शेट नरसीलाल यांना विनंती करण्यांत आली. वेढयाच्या जमिनीची माहिती नरसीलाल शेट यांनाही वेळोवेळीं विचारण्यांत आली. परंतु वेढे हें गांव, वाणगांव, चिंचणी व नेवाळें,

वगैरे गांवापासून फारच दूर असल्यामुळे त्याची माहिति त्यांनाही नाहीं, असें दिसले.

## ३६. वेढ्याच्या जमिनीची चौकशी. अप्पासाहेबांकडील हिशोबाची यादी नं. ४५. नेवाळें येथील ८ कुळांवर फिर्यादी नं. ४६

जून १९२९ महिन्यात वेढे गावच्या जमीनीची माहिति पुन्हा श्रीयुत अण्णासाहेब खरे यांना विचारण्याकरतां, प्रॉमिसरी नोटा लिहून देऊन बाकी भरली नाहीं अशा नेवाळे येथील ८ कुळांवर फिर्यादी देणेंकरतां व श्रीयुत अप्पासाहेब करंदीकर याजकडून त्यांनीं पंढरीनाथ व नेवाळ्याच्या ९ कुळाकडून वसूल केलेल्या बाकीचा, त्यांना दिलेल्या ॲडव्हान्सपैकीं, त्याच्याकडे राहिलेल्या रु.५९-११-६ बाकीचा व श्रीयुत अण्णासाहेब खरे यानीं अण्णाच्या खात्यापैकी, त्यांच्याकडे पाठविलेल्या रु. ४८--५--६ बाकीचा, तसेंच त्यानीं दरखास्तीचे कामीं, कृष्णलाल याना कर्जाचे पोटीं देण्याचे कामीं ज्या रकमा खर्च केल्या व टपाल, प्रवास, नोटीसा, फिर्यादी, दरखास्ती स्टॅम्प्स, वकील फी, रेकार्ड ऑफ् राईटस्चे उतारे वगैरे कामीं सन १९२५ सालापासून वेळोवेळीं ज्या रकमा खर्च केल्या त्याचा त्यांचेपासून खुलासेवार हिशोब मागणेकरता, श्रीयुत अण्णा-साहेब दाभोळकर व देव हे पुन्हां मल्याण येथे गेले. तेथें चार दिवस राहिले. आप्पासाहेबाडून हिशोबाची यादी घेतली व अण्णासाहेब खरे यांच्या हिशेबाच्या यादीवर सह्या घेतल्या व फिर्यादी दिल्या.

## ३७. वेढे जमीनीचा इतिहास व पुढील व्यवस्था.

अण्णा आपल्या मृत्युपत्रांत नेवाळें चिंचणी व वेढे या गांवीं आपली जमीन आहे व त्यांपैकीं कांहीं आपल्या ताब्यांत आहे व कांहींबद्दल कोर्टात दावे चालू आहेत असें लिहिले आहे. कोणत्या गावच्या जमीनीबद्दल कोर्टांत दावे चालू आहेत याबद्दल एक अक्षरही लिहिले नाहीं. कृष्णलालच्या हुकूमनाम्यास जी अण्णाच्या मिळकतींची एक यादी जोडली आहे तीवरून पाहातां वेढ्याचे जमीनींत अण्णाचा एक चतुर्थांश हिस्सा आहे व वेढ्याची सर्व जमीन आत्माराम अनंत यांचे नांवें सरकार कागदीं लागली असून धाराही तेच भरतात असे दिसलें.

ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांकडून जी ( नंबर ५ ची ) जमाखर्चाची यादी आली आहे तीवरून असे दिसते कीं, अण्णाची मिळकत त्या कोर्टाचे ताब्यांत असलेल्या मुदतींत वेढें गांवचे अण्णाच्या हिशाचे उत्पन्न त्या कोर्टाकडे आलेलें नाहीं. तसेच त्या कोर्टानें वेढें गांवचे जमीनींतील अण्णाच्या हिशाचा सरकार धाराही कधीं भरला नाहीं.

वेढे गांवच्या तलाठीकडून सदर जमीनीबद्दल जे रेकॉर्ड ऑफ् राईटस्‌चे उतारे आलले आहेत त्यांवरून सदर जमीनींपैकीं -॥- जमीन अण्णाचे कबजांत होती असे दिसते. कारण रेकार्ड ऑफ् राईटसचे कागदीं प्रत्यक्ष कबजे-दाराचेंच नांव लागते, नामधारी मालकाचें नाव लागत नाहीं. गाव कामगार प्रत्यक्ष कबजेदाराकडेच धाऱ्याची मागणी करतात. पण अण्णाकडून त्याचे -॥- हिशाचा धारा वसूल केल्याचे दिसत नाहीं.

वेढें गांव चिंचणीहून फार दूर आहे. चिंचणीहून प्रथम तांग्यांत किंवा मोटारींत बसून बोइसरला जावे लागते. तेथून रेल्वेंत बसून पालघरला जावयाचें. तेथून तांग्यांत अगर मोटारींत बसून मनोरला जावयाचें व तेथून आड मार्गानें पायीं किंवा बैलगाडींत बसून जावयाचें म्हणजे वेढे गावचा प्रवास फार लांबचा खर्चाचा व त्रासाचा आहे.

अण्णाच्या मिळकतीसंबंधाने जुने माहितगार म्हणजे एक श्रीयुत अण्णासाहेब खरे व दुसरे शेट नरसीलाल हरीलाल हे होत. पण त्यांना ही वेढे जमीनीसंबंधानें नक्की माहिती आहे असे दिसत नाहीं.

ज्या अर्थी आत्माराम अनंत ह्यांचेंच नांव सर्व जमीनीस लागलेले असून तेच धारा भरतात, त्याअर्थी ते कदाचित् वहिवाटदार या नात्यानें अण्णाच्या हिशाचें उत्पन्न वसूल करून अण्णास देत असावे व अण्णाकडून त्यांचे हिशाचा धारा घेऊन तलाठीकडे आपल्या नांवावर भरीत असावेत; परंतु अण्णा पासंबंधीं कांहीं हिशोब वगैरे ठेवीत असे की काय किंवा या जमिनीसंबंधानें

कांहीं दावा वगैरे चालत होता कीं काय, या संबंधाने माहिती कोणाकडून मिळत नाहीं.

सन १९२६ साली ट्रस्टीचे सॉलिसिटर मेसर्स दीक्षित माणेकलाल व कंपनी यांनीं या जमीनीच्या उत्पन्नासाठी जी आत्माराम अनंत यांना नोटीस दिली होती तिचा जाब आत्माराम अनंत यांनी आपले वकीलांमार्फत निवळ टाळाटाळीचा दिला आहे. त्यावरून वर काढलेल्या अनुमानास बरीच बळकटी येते. तथापि या अनुमानास लेखी अगर जागेवर प्रत्यक्ष पुरावा मिळाल्यावांचून तें अनुमान व्यर्थ आहे.

रेकॉर्ड ऑफ राइट्सच्या उताऱ्यावरून अण्णाचा त्या जमिनींत $\frac{1}{2}$ हिसा आहे असें दिसते; परंतु जमीन समाईक असून तिचें जाग्यावर प्रत्यक्ष वाटप झाले नसावे असें दिसते. कारण अण्णाचीं कुळे कोण कोण व अण्णास कोणकोणती कुळे किती मक्ता घालीत होती हे या उताऱ्यावरून मुळींच समजत नाहीं.

अण्णाच्या मृत्यूनंतर दुसरे दिवशी अण्णाचे घरांतील जंगममालाचा जो गांवकामगारांनीं पचनामा केला आहे, त्यांत अण्णाच्या दस्तऐवजी कागदाचा एक रुमाल असे लिहिले आहे. त्या पंचनाम्याप्रमाणे अण्णाचा सर्व जगम माल व स्थावर मिळकत ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टाचे ताब्यांत गेली. त्या कोर्टानें जंगम मालाचा लिलांव केला. नंतर जंगम मिळकतीचें उत्पन्न व स्थावर मिळकतीचे उत्पन्न यांतून खर्च वजा जातां बाकीची शिलक व स्थावर मिळकत ट्रस्टींनीं प्रोबेट घेतल्यावर त्यांचे ताब्यांत दिली. व जमाखर्चाची एक यादी ( कागद नं. ६ ) ट्रस्टींकडे पाठविली.

या यादीबरोबर ट्रस्टींना अण्णाचा दस्तऐवजी रुमाल मिळाला नाहीं. कदाचित् या दस्तऐवजी रुमालांत अण्णानें वेढयाच्या जमिनीसंबंधाने कांहीं हकीकत लिहून ठेविली असल्यास ट्रस्टीना या वेळीं त्या माहितीचा चांगला उपयोग होऊन सर्व संशयित मुद्यांवर चांगलाच प्रकाश पडेल. श्रीयुत धुरंधर वकीलांमार्फत सदर रुमाल डिस्ट्रिक्ट कोर्टांतून मागणेची तजवीज चालू आहे.

इतर निरुपयोगी कागद व सामनाबरोबर या रुमालाचा नाश झाला नसल्यास तो मिळण्याची आशा आहे.

वरील हकीकतीवरून श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर हे वेढयाच्या जमीनीसंबंधाने स्वस्थ बसले नसून अण्णाच्या हिशाचे उत्पन्न मिळण्याचे कामी शक्य तितकी खटपट करीत आहेत असे दिसून येईल.

वेढे येथील अण्णाच्या जमीनीची माहिती असलेल्या चिंचणी गांवांतील आणखी कांही लोकांस व पढरीनाथाचे भावास पुन्हां विचारून पाहातो व नंतर या बाबतीत पुढे काय करावयाचे ते ठरवूं असे श्रीयुत अण्णासाहेब खरे यांनी श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर व देव यांना मल्याण येथे गेले जून महिन्यांत समक्ष सांगितले व ही हकीकत त्याच वेळी अण्णासाहेब दाभोळकर व देव यानीं अप्पासाहेब करंदीकर यांनाही सांगितली आहे.

## ३८. प्रवास

अण्णाची मिळकत ट्रस्टीचे ताब्यांत आल्यापासून मल्याण, डहाणू वाणगाव, नेवाळे व चिंचणी या ठिकाणी चिंचणीची जमीन, अण्णाचे घर, बेडे, वाडी व नेवाळे येथील भात व गवती जमीन पाहाण्याकरता, गवत लिलांवाकरतां, कुळांचे एक साली करार लिहून घेण्याकरतां, श्रीयुत अण्णासाहेब खरे यांचेकडून अण्णाच्या जमीनीच्या पंढरीनाथ मार्फत केलेल्या वसुलाची माहिती घेण्याकरतां आप्पासाहेब करंदीकर यांनी पंढरीनाथाकडून व नेवाळे येथील कुळाकडून किती वसूल केला, त्यांच्याकडे बाकी किती राहिली, त्या बाकीबद्दल प्रॉमिसरी नोटा लिहून घेतल्या किंवा नाहीं हे पाहाण्याकरतां वेढयाचे जमीनीची माहिती मिळविण्याकरतां, कृष्णलाल मनोरदास याचा हिशोब मागण्याकरतां, त्याची तडजोड करण्याकरतां, तडजोडीप्रमाणे कृष्णलाल यांस पैसे देण्याकरतां, नेवाळ्याच्या जमीनीचे कुळाचीं तीन वर्षे पुरी झाल्यावर त्याकडून पुन्हा तीन वर्षांची कबुलायत लिहून घेण्याकरतां, थकलेल्या बाकींचा वसूल करण्याकरतां, बाकी न आल्यामुळे त्या त्या कुळावर फिर्यादी देण्याकरतां, श्रीयुत अण्णासाहेब खरे, शेट नरसीलाल व आप्पासाहेब करंदीकर यांजकडून त्यांचे मार्फत अण्णांच्या मिळकतीच्या झालेल्या व्यवहाराबद्दल हिशोबाच्या यादी घेण्याकरत

व अशाच आणखी कित्येक गोष्टींच्या चौकशी करतां श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर व देव हे पुष्कळ वेळां गेले. दोनतीन वेळां त्यांचे बरोबर कै. काकासाहेब दीक्षित होते. एकदोन वेळ रावबहादुर मोरेश्वरराव प्रधान व दोनतीन वेळां श्रीयुत आप्पासाहेब करंदीकरही होते.

## ३९. अण्णाच्या मृत्युपत्रांतील अट व ती काढून टाकण्याबद्दल डिस्ट्रिक्ट कोर्टास अर्ज.

कलम २ मध्ये शेवटी लिहिल्याप्रमाणे कलम १६ मध्ये दाखविल्याप्रमाणे अण्णाचे ८३७० रु. कर्ज फिटण्यास व नंतर अण्णाचे मृत्युपत्रांतील श्रीबाबांचे चिंचणी येथे मंदीर व त्यालाच जोडून बाबांच्या भक्तमंडळाकरतां एक घर बांधण्यास कमीत कमी ६-७ हजार रु. सांचविण्यास एकंदर कमीतकमी १८–२० वर्षे लागतील. म्हणजे हल्ली असलेल्या ट्रस्टीचे हयातींत या मिळकतीचे उत्पन्न श्रीबाबांच्या कारणी लागले हे पाहाण्याचा सोहळा त्यांच्या नशिबी क्वचितच येईल. व त्याप्रमाणे त्यांना जर हा सोहळा पाहातां आला नाही. तर आजपर्यंत श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांनी निर्हेतुकपणे जे कष्ट व प्रयत्न केले त्याचे चीज न होतां किंवा त्याचा यत्किंचितही मोबदला त्यांस न मिळतां निवळ कष्ट मात्र त्यांचे पदरांत पडतील, व असे होणे केव्हांही व कोणासही श्रेयस्कर होणार नाही, तरी असे होऊं नये, सर्व उत्पन्न बाबांच्या कामी मूळ पीठ जे शिरडी संस्थान त्या ठिकाणीच उपयोगांत यावे व अण्णाच्या इच्छेप्रमाणे चिंचणी येथे मंदीर व घर बांधल्यास, त्या ठिकाणीं, अण्णा हयात नसल्यामुळे व बाबांचें भक्तमंडळ चिंचणीस किंवा आजूबाजूचे गांवांत कोणीही नसल्यामुळे जसें अण्णाचे घर व बेडे चोरांनीं चोरून नेले त्याच प्रमाणे याही मंदिराची व घराची वासलत लागून मंदिरावर व घरावर केलेल्या खर्चाची रकम व्यर्थ जाऊं नये म्हणून मृत्युपत्रांतील ही मंदिर व घर बांधण्याची निरर्थक निष्कारण अट ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टास अर्ज करून काढून टाकावी असा कै. काकासाहेब दीक्षित यांचा सल्ला पडल्यामुळे व आतां शिरडी संस्थान खेरीजकरून इतर सर्व कर्ज फिटल्यामुळे तो अर्ज कर-

ण्याचे काम हाती घेतले आहे. रावबहादुर मोरेश्वरराव प्रधान यांनीं अर्जाचा मसुदा तयार केला आहे व तो श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर यांनी दिवाण बहादूर श्रीयुत गणपत सदाशिवराव माजी ॲक्टिंग हायकोर्ट जज्ज यांजकडे पसंतीकरतां, दुरुस्तीकरतां व जरूर तर त्या कामीं जास्त सूचना करण्याकरतां वान्द्राजवळ खार येथील त्यांचे बंगल्यांत ता. ६ जून १९२९ रोजीं नेऊन दिला आहे. त्यास सुमारे १ महिना झाला आहे. दिवाणबहादूर तूर्त आजारी आहेत. त्यांनी मसुदा पसंत केल्यावर थोड्याच अवधीत तो अर्ज ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांत देण्याची तजवीज ठेविली आहे.

## ४०. शिरडी संस्थानचें कर्ज मृत्युपत्रांतील अटींचा व वेढ्याच्या जमिनीचा निकाल लावून घेणें

अण्णाची मिळकत कृष्णलाल व इतर ४ सावकार यांचें कर्जातून जरी मुक्त झाली तरी कृष्णलालचे कर्ज देण्याकरतां शिरडीसंस्थानने अण्णाच्या ट्रस्टींना जे ता. ३१-१०-२७ रोजीं रु. २१०१ चे कर्ज दिले आहे. ते व्याजासह फिटल्यावाचून अण्णाची मिळकत पूर्णपणे कर्जमुक्त होत नाहीं. तथापि आतां राहिलेले कर्ज ४-५ वर्षांत फिटण्याची आशा आहे. म्हणून चिंचणीस बाबांचे मंदीर व बाबांचे भक्तमंडळाकरतां घर बांधण्याची मृत्युपत्रांतील अट डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून रद्द करून घेण्याचे प्रयत्नास व वेढे येथील अण्णाच्या हिशोबाच्या उत्पन्नाचा निकाल लावून घेण्याचे प्रयत्नास शक्य तितके लवकर लागणें अत्यंत जरूरीचे आहे.

## परिशिष्टे

अण्णा मयत झाल्यापासून आतांपर्यंत या प्रोसिडिंगमध्ये उल्लेख केलेले अण्णाच्या मिळकतीसंबंधाने महत्त्वाचे कागदव याच मिळकतीच्या उत्पन्नाचे सालोसालचे जमाखर्च १७ परिशिष्टांत नमूद करून ती परिशिष्टे या प्रोसिडिंगास शेवटीं जोडिली आहेत. त्यावरून आजपर्यंत मिळकतीचे कोणकोणत्या बाबींचे कोणकोणाकडून किती किती उत्पन्न आले व कोणकोणत्या बाबतीत किती किती खर्च झाला हे सहज व पूर्णपणें ध्यानी येईल.

## आभार

शेट नरसीलाल हरीलाल यांचा अण्णाच्या मिळकतीशी अगर शिरडी संस्थानशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसून वर लिहिल्याप्रमाणे त्यांनी निरलस व निरपेक्ष बुद्धीने या कामी जी वेळोवेळी मदत केली आहे व हल्लीही करीत आहेत त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. त्यांची मदत खरोखरीच प्रशंसनीय व बहुमोल अशी आहे.

## केलेल्या व्यवस्थेस मान्यता व पसंती

वर लिहिल्याप्रमाणे, शिरडी संस्थानची माझी खासगी व इतर कामें सांभाळून अण्णाच्या मिळकतीची आजपर्यंत केलेली व्यवस्था अण्णांचे इतर ट्रस्टी यांजपुढे मी सविस्तरपणे मांडीत आहे. प्रथम ही व्यवस्था कै. काकासाहेब दीक्षित पाहात असत व मी त्यांना मदत करीत असे;परंतु काकासाहेब हे एकाएकी वारल्यामुळे व हे काम अण्णाचे नव्हे,तर श्रीबाबांचेच आहे अशी त्यांची पूर्ण भावना असल्यामुळे व शेवटी ही मिळकत त्याच सच्चिदानंद श्री बाबाच्या कृपेने शिरडी संस्थानकडेच येणार अशी मला बलवत्तर आशा असल्यामुळे निरलसपणाने व निष्कामबुद्धीने मी ही व्यवस्था केली आहे व करीत आहे. मला कोणी मॅनेजीग ट्रस्टी नेमले नाही. या व्यवस्थेतील प्रत्येक गोष्ट मी ट्रस्टीच्या समतीने केली आहे. तरी कृपेने हे प्रोसिडिंग त्यास जोडलेल्या परिशिष्टासह नीट वाचून पाहून त्यांत कांही कमजास्त आढळल्यास त्याबद्दल सूचना करून केलेली व्यवस्था मान्य व पसत असल्याबद्दल सर्व ट्रस्टींनी याच प्रोसिडिंगाखाली सह्या कराव्या व पुढे ही व्यवस्था कोणी करावयाची हेही त्यांनी ठरवावे अशी माझी त्यांना नम्र विनती आहे.

**सदरहू प्रोसिडिंग बरोबर आहे.**
**१३-७-२९**

A. J. Karandıkar
Moreshwar W. Pradhan
28-7-29
A. N Khare
27-9-29
L. G Mahajani
8-10-29
Mr. Deo ( B. V. Deo )
10-10-29

**ठाणें,**

**ता. १९-७-२९**

# परिशिष्ट १

## प्रोसीडिंगांत निर्दिष्ट केलेल्या कागदांची यादी.

| नंबर | कागदाचें नांव |
|---|---|
| १ | मृत्युपत्र |
| २ | गांव कामगारांनी केलेला स्थावर जंगम मिळकतीचा पंचनामा. |
| ३ | प्रोबेट मिळण्याकरिता ट्रस्टींनीं केलेला अर्ज. |
| ४ | प्रोबेट. |
| ५ | कोर्टाकडून आलेली मिळकतीची तावे यादी. |
| ६ | कोर्टाकडील जमाखर्चाची यादी. |
| ७ | श्री धुरंधर यांचें पत्र |
| ८ | चिंचणीचे वाडीबद्दल मोरू पदमणाचा एकसाली करार. |
| ९ | चिंचणी जमिनीबद्दल सुकट्या लक्ष्मणाचा एकसाली करार. |
| १०<br>११<br>१२<br>१३<br>१४ | चिंचणी जमिनीचें खातें उतारे व नेवाळें व वेढें जमिनीचे रेकॉर्ड आफ राईटस्चे उतारे. |
| १५ | कृष्णलालच्या हुकूमनाम्याची नकल |
| १६<br>१७<br>१७ अ<br>१७ ब<br>१७ क | श्री अण्णासाहेब खरे यांजकडील हिशोबाच्या ५ यादी. |
| १८<br>१९<br>१९ अ<br>२०<br>२० अ | मिळकतीच्या हिशोबाच्या ३ कोर्दे चोपड्या व २ खाते वह्या |
| २१ | कृष्णलालचा हिशोब |
| २२ | कृष्णलालची तडजोड |
| २३ | कृष्णलालजी रजिस्टर पावती |
| २४ | कृष्णलाल व त्याचे ४ भागीदार यांची साधी पावती |
| २५ | कृष्णलालच्या पहिल्या दरखास्तीची नकल |
| २६ | श्री अण्णासाहेब खरे यांजकडून आणलेली माहिती. |
| २७<br>२८<br>२९ | दुसरे दरखास्तीच्या नोटीसा |
| ३० | शेठ नरसीलाल यांजकडून आलेली यादी. |
| ३१ | मोरू पदमणचा करार तिसरे व दुसरे वर्षाचा |
| ३२ | सुकट्या लक्ष्मणचा तिसरे व दुसरे वर्षाचा करार. |
| ३३ | मोरेश्वर भिमाचा करार पहिले वर्षाचा, दुसरे व तिसरे वर्षाचा |
| ३४ | जमीन विक्रीची नोटीस |
| ३५ | श्री आत्माराम अनंत यांस वेढयाच्या जमिनीचे हिशाबद्दल नोटीस. |
| ३६ | आत्माराम यांचा जाब |
| ३७ | आत्माराम यास पुन्हा नोटीस. |
| ३८ | कृष्णलाल याची २०० रुपयांची पावती |

| नंबर | कागदाचें नांव |
|---|---|
| ३९ | वामन भिवाच्या हुकूमनाम्याची नकल |
| ४० | कृष्णलालची ४०० रुपयांची पावती |
| ४१ | कृष्णलालची ४० रुपयांची पावती |
| ४२ | कोर्टाकडे केलेल्या अर्जाची नकल |
| ४३ | निकालाची नकल |
| ४४ | मोरेश्वर भिमाचा चवथे वर्षाचा नवा करार |
| ४५ | श्री आप्पासाहेब करंदीकर यांजकडील हिशोबाची यादी |
| ४६ | नेवाळें येथील कुळावर फिर्याद |

बालकृष्ण विश्वनाथ देव
ठाणें ११-७-२९

## परिशिष्ट २

**श्री शिर्डी संस्थान कोठो कीर्दीतून अण्णाचें कर्ज फेडण्याकरितां व तसेंच इतरही कामीं खर्च करण्याकरतां वेळोवेळीं हसनवार घेतलेल्या रकमांचें सन १९२३ पासून १९२९ मध्यापर्यंतच्या जमाखर्चाचें कोठी कीर्द खातें.**

**जमा**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ३०७-०-० | स्टँपा करतां ता. ४-३-२४ |
| १५०-०-० | आप्पासाहेब करंदीकर यांना अडव्हान्स ता. ५-६-२५ |
| ५०-०-० | नेवाळ्याचा धारा भरण्याकरतां ता. १६-४-२६ |
| ८०-०-० | नरोत्तम केशव याचें कर्ज देण्याकरतां ता. ३०-४-२६ |
| ३०-०-० | प्रवास खर्चाकरतां ता. ४-६-२६ |
| ६१७-०-० | |
| ४-१५-६ | प्रवास खर्च सन १९२३ साल कीर्दपान २३ पहा |
| ५-२-९ | प्रवास व टपाल खर्चाकरितां सन १९२८ सालांत |
| ६-१०-० | सदर १९२९ |
| १६-१२-३ | |
| ६३३-१२-३ | |

**खर्च**

| रु. आ. पै | |
|---|---|
| ४-१५-६ | प्रवास खर्च १९२३ सालांतील, कीर्द १३ पहा. |
| ३०७-०-० | कोठी कीर्दीस परत ता. २०-८-२४ |
| १३०-०-० | ता. १६-४-२६ व ३०-४-२६ रोजीं घेतलेल्या रकमा परत |
| १५०-०-० | ता. २८-९-२७ आप्पासाहेबांस देण्याकरतां घेतलेली अॅडव्हान्स |
| ३०-०-० | परत ता. १६-६-२८ |
| ६२१-१५-६ | |
| ११-१२-९ | बाकी देणें. |
| ६३३-१२-३ | |

बालकृष्ण विश्वनाथ देव
ठाणें ता. ११—७—२९

# परिशिष्ट ३

## उत्पन्न खातें

### बाकी येणें

**जमा**

रु. आ. पै.

४८६७-८-० परिशिष्ट ३ अ यांत हाख-
विलेला वसूल.

रु. १७५२ संवत १९८२ व ८१
८७३ संवत १९८२

६८२-१२-० सं. १९८३
६७८-१२-० सं. १९८४
८८१—०-० सं. १९८५

४८६७-८-०

४२९-११-६ वसूल वजा जातां संवत
१९८५ अखेर येणें बाकी
एकंदर १२ कुळें आहेत
त्यांची खातीं घातली आ-
हेत त्यावरून कळेल.

२९७-३-६

**खर्च**

रु. आ. पै

६२९७-३-६ संवत १९८० ते सं. १९८५
अखेर किंवा शके १८४५ ते
शके १८५० अखेर किंवा सन
१९२३ ते सन १९२८ अखेर
डिक्री भात, गवत, झाडोरा,
वाडी व बेडें वगैरेचें, नेवाळें
व चिंचणी येथील कुळाकडून
एकंदर येणें.

३६८३-३-६ संवत १९८०
व ८१ व १९८२ बद्दल
८८४-०-० संवत १९८३
८६५-०-० संवत १९८४
८६५-०-० संवत १९८५

६२९७-३-६ २६१४-०-०

बालकृष्ण विश्वनाथ देव.

ठाणें, ता. ११-७-२९

# परिशिष्ट ३ अ

## मिळकतीच्या उत्पन्नाचें खातें

### वसूल

**जमा**

| रु. आ. पै | | |
|---|---|---|
| २००-०-० | शके १८४६ | चैत्र |
| २५०-०-० | ” | |
| १३०२-०-० | ” | माघ |
| ७५-०-० | शके १८४७ | जेष्ठ |
| ३५१-०-० | ” | श्रावण |
| २५१-०-० | ” | ” |
| १६८-०-० | ” | पौष |
| २८-०-० | ” | ” |
| १३१-०-० | शके १८४८ | वैशाख |
| २०-०-० | ” | जेष्ठ |
| १३१-१२-० | ” | ” |
| ४००-०-० | ” | ” |
| १२३-१२-० | शके १८४९ | जेष्ठ |
| ९-०-० | ” | ” |
| ४००-०-० | ” | ” |
| १४६-०-० | ” | भाद्रपद |
| ८००-०-० | शके १८५० | जेष्ठ |
| ८१-०-० | ” | पौष |
| ४८६७-८-० | उत्पन्न आलेली रक्कम | |

**खर्च**

| रु. आ. पै | |
|---|---|
| ४१२८-१२-० | नेवाळें येथील भात गवत व झाडोरा विक्रीचें उत्पन्न |
| २६९-१२-० | चिंचणी भातजमिनीचें उत्पन्न |
| १०-०-० | चिंचणी वाडीचें उत्पन्न |
| ९-०-० | अण्णाच्या चिंचणी येथील बेड्याच्या विक्रीचें उत्पन्न |
| ४५०-०-० | ठाणें डि. कोर्टानें स्थावर जंगम मालापैकीं पाठविलेलें उत्पन्न. |
| ४८६७-८-० | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.

ठाणें ११-७-२९

## परिशिष्ट ४

### कोर्ट खातें

जमा

खर्च

| रु. आ. पै. | | | |
|---|---|---|---|
| २०७–०–० | स्टॅंप शके | १८४६ | चैत्र |
| ०–२–० | ,, | ,, | जेष्ठ |
| ०–२–० | ,, | ,, | श्रावण |
| ३–८–० | ,, | ,, | भाद्रपद |
| २०–११–६ | ,, | १८४७ | |
| ०–०–० | ,, | १८४८ | |
| ४५–४–० | ,, | १८४९ | भाद्रपद |
| १०–१३–० | ,, | ,, | कार्तिक |
| ३८७–८–६ | एकंदर आज तारखेपर्यंत खर्च | | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.

ठाणें ता. ११–७–२९

## परिशिष्ट ५

### सरकारधारा खातें

जमा

खर्च

| रु. आ. पै. | | | |
|---|---|---|---|
| १००–१५–३ | शके | १८४६ | चैत्र |
| १०१–२–९ | ,, | १८४७ | पौष |
| १३–७–६ | ,, | ,, | ,, |
| १३–७–६ | ,, | ,, | ,, |
| १०१–०–० | ,, | १८४८ | चैत्र |
| १–०–० | ,, | ,, | जेष्ठ |
| १०१–०–० | ,, | १८४९ | ,, |
| १३–७–६ | ,, | ,, | ,, |
| १३–७–६ | ,, | १८५० | ,, |
| १०१–०–० | ,, | ,, | ,, |
| ५१–०–३ | ,, | ,, | पौष |
| १३–७–६ | ,, | ,, | ,, |
| ५०–०–० | ,, | ,, | ,, |
| ६७४–७–९ | | | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.

ठाणें ता. ११–७–२९

## परिशिष्ट ६

### टपाल खातें ( पोष्ट खातें )

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| ०-१-० | शके १८४७ माघ | ३-१०-० | शके १८४६ चैत्र ते फाल्गुन |
| | | ३-०-६ | ,, १८४७ ,, ,, |
| | | २-८-६ | ,, १८४८ ,, ,, |
| | | ०-११-० | ,, १८४९ ,, ,, |
| | | २-११-० | ,, १८५० ,, ,, |
| | | १-१२-६ | ,, १८५१ जेष्ठ अखेर |
| | | १४-५-६ | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ११-७-२९.

## परिशिष्ट ७

### प्रवास खातें.

| जमा | खर्च | |
|---|---|---|
| रु. आ. पै. | रु. आ. पै. | |
| | १७-१२-३ | शके १८४६ चैत्र ते फाल्गुन |
| | १०-१२-६ | ,, १८४७ ,, ,, |
| | १०-४-० | ,, १८४८ ,, ,, |
| | १३-३-६ | ,, १८४९ ,, ,, |
| | ३-१४-३ | ,, १८५० ,, ,, |
| | ४-१३-६ | ,, १८५१ जेष्ठ अखेर |
| | ६०-१२-० | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ११-७-२९

# परिशिष्ट ८

## श्री अण्णासाहेब खरे रा॥ डहाणू यांचें खातें

**जमा**

रु. आ. पै.

४१२-५-६ ट्रस्टीकडे मिळकत येण्यापूर्वी अण्णाकडे निघत असलेलें येणें बरहुकुम यादी

४८-२-९ अण्णा चिंचणीकर यांचे हिशोबापैकीं येणें होती ती त्यांनी परस्पर श्री. अण्णासाहेब करंदीकर यांचेकडे भरली.

**खर्च**

रु. आ. पै.

४१२-५-६ ता. २४-८-२३ रोजी नेवाळें गवती जमिनीच्या गवताच्या आलेल्या २ वर्षांच्या रकम रु. १३०२मधून ही रकम कापून घेऊन व इतर खर्च वजा करून बाकी रकम कृष्णलालचे दरखास्ती पोटीं डहाणू कोर्टांत भरली.

०-१०-० रुपये १३०२ पैकीं घेणें निघत आहे तें

४८-२-९ अण्णासाहेब खरे यांचे नांवें जमा करून आप्पासाहेब करंदीकर यांचे नांवें खर्ची घातली आहे.

**बालकृष्ण विश्वनाथ देव.**

ठाणें ११—७—२९

# परिशिष्ट ९

## श्री कृष्णलाल मनोरदास रा॥ चिंचणी यांचें खातें.

**जमा**

रु. आ. पै

६२४७-८-९ ता. ३१-१०-२७ अखेरपर्यंत हिशोब करून देणें निघालेली रकम

४००९-३-० हुकुमनामा

२१७१-१३-० व्याज व खर्च

६६-८-९ दरखास्त खर्च

६२४७-८-९

**खर्च**

रु. आ. पै

७५-०-० ता. १८-६-२५ डहाणू कोर्टांत भरले

८८९-०-० „ ३०-१-२५ सदर

१५०-०-० „ २९-३-२५ सदर

१००-०-८ „ १९-८-२५ सदर

४०-४-३ „ ११-११-२५ सदर

२००-०-० „ ४-७-२६ करंदीकर यांनीं दिले

| | | |
|---|---|---|
| ४००–०–० | ,, | १–९–२६ नरसीलाल यानी दिले |
| ४०८–०–६ | ,, | ७–६–२७ सदर |
| २१०१–०–० | ,, | ३१-१०-२७ दाभोळकर यांनी दिले |
| ४३६३–४–९ | | |
| १२०९–२–६ | | पूर्वी ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टानीं दिले २५–१–२१ रोजीं |
| ६७५–१–६ | | कृष्णलालनें तडजोडीचे वेळीं दिलेली सूट |
| ६२४७–८–९ | | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ११–७–२९.

## परिशिष्ट १०

### श्री आप्पासाहेब करंदीकर यांचें खातें

| जमा रु. आ. पै. | | खर्च रु. आ. पै. | |
|---|---|---|---|
| ५०–०–० | ता. ३०–६–२५ परत जमा | १५०–०–० | ता. ५–६–२५ कोठीकीर्दीतून उसनवार घेऊन अडव्हान्स दिले ते. |
| ४०–४–३ | ता. ११–११–२५ डहाणू कोर्टांत भरले | | |
| ४८–२–९ | ता. ९–६–२६ श्री अण्णासाहेब यांजकडून आलेले | ४८–२–९ | श्री आण्णासाहेब खरे यांनीं त्यांचा कारकून यशवंत याजबरोबर पाठविले ते. ता. ९–६–२६ |
| ५–९–३ | शके १८४८ जेष्ठ मास | | |
| ४९-१०-० | शके १८४९ कीर्दीत तपशील आहे. | | |
| १९३–१०–३ | | १९८–२–९ | |
| ४–८–६ | ट्रस्टींना आप्पासाहेबांनीं देणें | | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ता. ११–७–२९

## परिशिष्ट ११

### श्री. कै. काकासाहेब दीक्षित रा॥ विलेंपार्लें यांचें खातें.

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| ३५०-०-० | मिळकतीचा ताबा येणेंपूर्वी निघत असलेलें देणें | ३५०-०-० | ता. १०-८-२५ रोजी काकासाहेब यांस दिले |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ११-७-२९

## परिशिष्ट १२

### श्री नरोत्तम केशव यांचें खातें

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| ८०-०-० | मिळकत ताब्यांत येण्यापूर्वी अण्णा विरुद्ध झालेल्या निवाड्याबद्दल निघत असलेले रुपयांचें देणें श्री. कै. काकासाहेब दीक्षित यांच्या सांगण्यावरून | ८०-०-० | ता. ३०-४-२६ रोजीं श्री. कै. काकासाहेब दीक्षित यांना श्री. नरोत्तम यांना देण्याकरितां दिले. |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ११—७—२९

## परिशिष्ट १३

### श्री अण्णासाहेब दाभोळकर रा॥ वांद्रें यांचें खातें

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| ०-०-६ | शके १८४८ साली पौष महिन्यांत चुकीनें जमा झालेले दिसतात. ते खर्चीं घालून घेणें. | | |

बालकृष्ण विश्वनाथ देव.
ठाणें ११-७-२९

## परिशिष्ट १४

### शेठ नरसीलाल हरीलाल रा॥ चिंचणी यांचें खातें.

| जमा | खर्च |
|---|---|
| रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| ०-१४-० शके १८५० जेष्ठमास | ९-०-० शके १८४९ जेष्ठ मास |
| ३३-७-९ शके १८५० पौष मास | ———— |
| ———— | २५-५-९ |
| ३४—५—९ | ट्रस्टीनीं नरसीलाल शेठ यांना द्यावयाचे |

बालकृष्ण विश्वनाथ देव.

ठाणें ११-७-२९

## परिशिष्ट १५

### श्री शिर्डी संस्थान कायम फंड खातें.

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| रु. आ. पै. | | रु. आ. पै. | |
| २१०१-०-० | ता. ३१-१०-२७ रोजीं कृष्णलाल यांस देण्यासाठी कायम फंडांतून घेतलेलें कर्ज म्हणून | ६६८-५-६ | ता. १३-६-२८ कर्जापोटीं कायम फंड कीर्दीस जमा करण्यास दिले. |
| १०-१३-० | ता. ३१-१०-२७ रोजी कृष्णलालची पावती रजिस्टर करून घेण्यास खर्चासाठीं घेतलेले. | | खर्च १०-१३-० |
| | | | मुद्दल ५४०-५-६ |
| | | | व्याज ११७-३-० |
| ———— | | | ———— |
| २१११-१३-० | | | ६६८-५-६ |

बालकृष्ण विश्वनाथ देव.

ठाणें ११-७-२९

# परिशिष्ट १६

## श्री आत्माराम अनंत बाबरे रा॥ चिंचणी यांचें खातें

| जमा | खर्च |
|---|---|
| रु. आ. पै | रु. आ. पै |
| ८०-४-० मिळकत ताब्यांत येण्यापूर्वी ठाणें डि. कोर्टाकडे व्यवस्था असल्या वेळी निघत असलेलें देणें. | ७८८-८-० ता १-११-२२ |
| | १९०-०-० ता. १७-४-२३ |
| | ३०१-१२-० ता. ६-१०-२३ |
| | १२८०-४-० हें देणें परभारें डि कोर्टानें आत्माराम याना दिलें आहे. सबब हें खातें ट्रस्टींनीं ठेवलेल्या हिशोबाचे चोपड्यांत दिसणार नाहीं. |

**बालकृष्ण विश्वनाथ देव.**

ठाणें ११-७-२९

# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ |
|---|---|---|---|
| आपली दैवाची | आपली व दैवाची | २ | १२ |
| अण्णासाहेब | आप्पासाहेब | ५ | १७ |
| गणेश लक्ष्मण | लक्ष्मण गणेश | ,, | २१ |
| ३०५ | ३०७ | ७ | १० |
| देव | दवे | ८ | ३ |
| चिचवणी | चिंचणी | ९ | १२ |
| चिंचणा | चिंचणी | ९ | १६ |
| बद्दलचें उत्पन्न | डहाणू कोर्टाकडून अण्णाच्या हक्काबद्दल आलेलें उत्पन्न. | १० | ३ |
| अण्णासाहेब | आप्पासाहेब | ११ | ५ |
| बाणगावचे | वाणगांवचे | १२ | १ |
| बाणगावाहून | वाणगांवाहून | १२ | ८ |
| नतर | नंतर | ,, | १० |
| | ८–८–२४ | ,, | २० |
| ३०० | ३०७ | ,, | २४ |

# ज्ञानाचे कण

मोत्ये समुद्रकिनाऱ्यावर पडलेलीं नसतात. जर तुला तीं पाहिजे असतील तर समुद्राच्या तळाशीं बुडी मार.

आलेला दिवस संतोषवृत्तीने काढीत जा. कारण त्यांतच तुला खरे सुख आहे.

प्राण द्यावा लागला तरी सत्य विकत घे, परंतु स्वर्ग मिळाला तरी ते विकूं नकोस.

तूं स्वकराने जे मिळवितोस अथवा काटकसरीने जें राखतोस तें सर्व अमोल वस्तूपेक्षां अमोलिक आहे.

मैत्रीचें रूपांतर प्रीतींत होतें,पण प्रीतीचे रूपांतर मैत्रींत कधींच होत नाहीं.

जिवाची क्षणभंगुरता हा एक जगांतील सर्व ऐहिक सुखे तुच्छ मानण्यास भक्कम पुरावाच होय.

तूं स्वतः सदाचरणी असल्याशिवाय दुसऱ्यांना सदाचरणाबद्दल उपदेश करूं नकोस,कारण त्याने तुझा उपहास तर होईलच, पण कांहीं सदाचरणी लोकांचीही अवहेलना होईल.

अनुभवाने शहाणा झालेला मूर्खास ओळखूं शकतो. कारण तो स्वतःच मूर्ख होता, पण मूर्ख मात्र शहाण्यास ओळखूं शकत नाहीं. कारण तो त्या वेळीं शहाणा झालेला नसतो.

आपलें आचरण इतकें शुद्ध ठेव कीं, जगांतील अत्यंत दुराचाऱ्यानेंही तुला पाहिल्याबरोबर वचकावें.

मत्सर व द्वेष हे संशयाचे अनुक्रमे सख्खे व चुलत बधु होत.

संकटसमयीं धैर्य, मनाची समतोलता, हीं विजयी सैन्यापेक्षा जास्त बलवान् असतात.

जर तूं कोणास दुखविणार नाहींस तर तुझे कोणासही वाकडे करता येणार नाहीं

( चालः—अनुसारी )

**धैर्य कसें दिधलें ॥ नाकळे ॥**
**दर्शन देउनि दिन अबलेला ऐसें कां फसविलें ॥ नाकळे ॥**
**गौप्य तुझें तें कांहीं कळेना संशयांत बुडलें ॥ नाकळे ॥**
**नित्य विसांवा माझा देवा. रत्न तुवां हरिलें ॥ नाकळे ॥**
**मृत्युलोक हें कोंदण तुजला, विपरित कां दिसलें ॥ नाकळे ॥**
**निराधार दासीला तुजविण स्थान अन्य नुरलें ॥ नाकळे ॥**

**सावित्रीबाई तेंडुलकर.**

तापानें पोळला, **असें मनिं धरा,**–असें आपल्या–मनिं धरा–मनांत आणा, कारण–मला **आपला भरंवसा खरा,**–अर्थात् आपल्याशिवाय इतर कोणाचाहि मला खरा भरंवसा नाहीं–इतर कोणीहि माझे त्रिविध दुःख निवारण करण्यास समर्थ नाहीं, म्हणून माझा त्यांजवर खरा भरंवसा नाही. याच म्हणण्याचें समर्थन कवि पुढल्या केकेंत करितात.

---

नमामतेदेवपदारविंदंप्रपन्नतापोपशमातपत्रं ॥
यन्मूलकेतायतयोऽजसोरुसंसारदुःखंबहिरुत्क्षिपंति ॥ ३८ ॥
धातर्यदस्मिन्भवईशजीवास्तापत्रयेणोपहतानशर्म ॥
आत्मल्लभंतेभगवस्तवाङ्घ्रिच्छायांसविद्यामतआश्रयेम ॥ ३९ ॥

भाग स्कं. ३, अ. ५

१ एथे कवीनी भगवच्चरणारविंदीं जशी आपली श्रद्धा दर्शविली आहे, तशीच भागवतात श्रद्धावान् पुरुषाची श्रद्धा सरस अर्थानें वर्णिली आहे,—

स्वकृतपुरेष्वमीष्वबहिरंतरसंवरणं
तवपुरुषंवदत्यखिलशक्तिधृतोऽशकृतम् ।
इतिनृगतिंविविच्यकवयोनिगमावपनं
भवतउपासतेऽङ्घ्रिमभवंभुविविश्वसिता. ॥

स्कं. १०, अ. ८७, श्लो. २०

मलानिरखितांभवच्चरणकन्यकाआपगा ।
म्हणेअगइऐकिलेंहिनकधीअसेंपापगा ॥
करश्रवणिंठेवितीनुघडिनेत्रघेभीतिला ।
नघालिनभिडेसमींजरिंहिकार्यलोभीतिला ॥ १० ॥

या केकेंत कवि स्वपातित्याचें मान दर्शवित होत्साते, मला तुझाच भरंवसा खरा आहे म्हणून मागल्या केकेंत जे सांगितले, त्याचेंच आणखी प्रकारांतरानें समर्थन करितात.

पदान्वय—भवच्चरणकन्यका आपगा मला निरखितां अगइ असें पाप कधीं हि न ऐकिले गा म्हणे, श्रवणिं कर ठेविती, नेत्र नुघडी, भीतिला घे, जरीं हि मी कार्यलोभी, तिला भिडेस न घालिन.

मला तुझ्याशिवाय खरा भरंवसा दुसऱ्या कोणाचा नाहीं, याचें कारण मी फारच पापी आहे, आणि तू फारच दयालु आहेस, म्हणून मागल्या केकेंत कवींनी दर्शविले, त्याच आपल्या अभिप्रायाचें समर्थन करित होत्साते आपण किती पापी आहों हे प्रथमत कवि सांगतात.—भवच्चरणकन्यका आपगा मला निरखितां अगइ असें पाप कधीं हि न ऐकिलें गा म्हणे,–भवच्चरणकन्यका,–आपल्या चरणापासून उत्पन्न झाली,–कन्यका–लहान कन्या, जी–आपगा–नदी[1]–अर्थात् भागीरथी,[2] ही भागीरथी विष्णुपदापासून उत्पन्न झाली अशी कथा प्रसिद्ध आहेच; आणि ती सर्वांस पावन करणारी आहे हेंहि सर्व जाणतात ती कवि म्हणतात–मला निरखितां–मला न्याहाळून पाहातां अगइ असें पाप कधीं हि न ऐकिलें गा म्हणे,–अगइ असे पाप म्यां कधीहि ऐकिले नाहीं असें म्हणते, अगइ हे खेद किंवा आश्चर्य यांचे द्योतक केवलप्रयोगी अव्यय होय; याचा प्रयोग बहुधा स्त्रिया व मुले यांच्या भाषणांत होत असतो; भय वाटले असतां अथवा कांहीं चमत्कार पाहिला असतां, निरंतर आईच्या सन्निध राहाणारीं मुलें

१ तरंगिणीशैवलिनीतटिनीह्रदिनीधुनी
स्रोतस्वतीद्वीपवतीस्रवंतीनिम्नगाऽपगा

—अमर

२ गंगाविष्णुपदीजन्हुतनयासुरनिम्नगा

—अमर

त्या भयाच्या निवारणार्थ, अथवा तो चमत्कार दाखविण्याकरितां आपल्या आईसच प्रथम-'अगे आई' म्हणून हाका मारितात, त्याच संबोधनाचे अगइ हे संक्षिप्त रूप होय, येणेंकरून भागीरथीची सभयता ध्वनित होते; **मला निरखितां**-म्हणजे मला न्याहाळून पाहातांच माझ्या स्वरूपावरून तिने तत्काळ ओळखलें की, मी अत्यंत पापी आहें असा एथें **निरखणें** या धातूच्या प्रयोगावरून ध्वन्यर्थ होतो, **असें पाप**-म्हणजे माझ्यासारखें पाप,-कवि म्हणतात, मत्कृत पाप, **कधी हि तिणें न ऐकिलें गा**,-इतके लक्षावधि पापी मजजवळ आले असतील, परंतु असे पाप त्यां कधींहि ऐकलें नाहीं गा, मग मजसारिखे पापी पाहिले कोठून, असा एथील ध्वन्यर्थ, **म्हणे**-असें ती म्हणते; एथें **गा** हें आश्चर्यद्योतक अव्यय जाणावें, तिच्या आश्चर्याचीं व भयाची आणखी चिन्हे कवि प्रस्फुट करितात-**कर श्रवणिं ठेविती**,*-**कर**-हात, **श्रवणिं**-कानावर, ( ही अधिकरणी सप्तमी ), **ठेविती**-ठेविते; अथवा, **ठेविती** एथें **ठेवी**-ठेविते, आणि **ती** असे दोन निराळे शब्द काढावे हे मला अधिक प्रशस्त दिसतें. कारण पुढें **नुघडि, घे**, ही अशीच ग्रंथभाषेतील सततवर्तमानकालार्थी क्रियापदें योजिली आहेत; तिच्या कानावर हात ठेवण्याने कवीनीं आपला पापातिशय दर्शवून तिजपासून आपलें अनुद्धारार्हत्वहि दर्शविले, लोकांतहि, त्यांत विशेषेंकरून स्त्रियांत, कांहीं आश्चर्य अथवा एखाद्या गोष्टीची अश्राव्यता, अथवा अनंगीकार दाखवावयाचा असतां कानावर हात ठेवण्याची चाल प्रसिद्ध आहे, आणखी-**नेत्र नुघडि**,—**नेत्र** डोळे **नुघडि**-उघडीत नाही;+अर्थात मला पाहातांच तिनें जे आपले डोळे मिटले ते तिने उघडिले नाहींत; येणेंकरून कवीनी पापमालिन्यानें आपल्या स्वरूपाचे त्रासदायकत्व दर्शवून तेणेंकरून तिच्या सभयतेस आणखी हेतु दर्शविला; आणखी याप्रमाणे चिन्हे दाखवून **ती-भीतिला घे**,-**भीतिला**-भयाला, **घे**-घेते -अर्थात् भयाभित होते, एथे 'भीतिला' ही कर्मणि द्वितीया; अशी गोष्ट आहे म्हणून कवि म्हणतात-**जरी हि मी कार्यलोभी**,-यद्यपि मीं कार्यलोभी,-**कार्य**-अर्थात् आपल्यास पावन करवून घेण्याचे काम, त्याविषयीं-**लोभी**-लोभाविष्ट आहें, एथे 'आहें' या क्रियेचा अध्याहार जाणावा. **तथापि-तिला भिडेस न घालिन**,-**तिला** भागीरथीला-अर्थात् अशा भित्रीला

* कोठे ठेविल्ये, ठेविते, असाहि पाठ आढळतो.

\+ **नुघडि**. एथें 'उघडणे' या स्वरारंभक धातूच्या योगाने 'न' या शब्दातील अस परसवर्ण आदेश झाला आहे. नसणें, नावरणें, नायणे. नातळणे, नातुडणें, नुरणे, नुगवणे इ० अशा प्रकारच्या धातूंची आणखी उदाहरणें.

भिडेस न घालिन–भिडेस घालणार नाहीं, यद्यपि कार्यलोभी जन स्वकार्यसाधनाकरितां पात्रापात्रविवेचन करण्याचें धोरण ठेवीत नाहीत, ते जो सांपडेल त्यास भीड घालितात, तथापि कवि म्हणतात, मीं तसें करणार नाहीं; कारण जी मला पाहून भिते, व माझा त्रास करिते, आणि त्यांत, 'कन्यका–म्हणजे पोरगी' या शब्देंकरून तिच्या सामर्थ्याचें न्यूनत्वहि कवीनें दर्शविलें, अशा भागीरथीपासून माझा उद्धार कदापि होणार नाहीं, म्हणून तुझाच भरंवसा मला खरा आहे असें जें पूर्वी मी बोललों, तेच खरें; असा एथील कविहृद्गतार्थ जाणावा. एथें स्वभावोक्ति अलंकार जाणावा.

सदैवनमितांजरींपदललाटकेलेंकिणें ।
नसेइतरतारितामजभवत्पदाब्जाविणें ॥
नतांकरुनिमुक्तहीम्हणसिमीबुडालोंरिणें ।
अशातुजनजोभजेमनुजधिक्तयाचेंजिणें ॥ ११ ॥

भगवंताशिवाय दुसरा मला कोणी त्राता नाहीं हें या केकेंत सांगून, तो केवढा दयालु आहे हेंहि कवि एथें वर्णितात.

पदान्वयः—सदैव नमितां जरीं किणें ललाट पद केलें, (तरी) भवत्पदाब्जाविणें इतर तारिता मज नसे, नतां मुक्त करुनि ही मी रिणें बुडालों म्हणसि, अशा तुज जो मनुज न भजे, तयाचें जिणें धिक्.

कदाचित् तू म्हणशील की, भागीरथीशिवाय इतर देव, मानव, पुष्कळ तारणारे आहेत, त्यांस कां शरण जात नाहींस ? तर त्यांजविषयीं ऐक-**सदैव नमितां जरीं किणें ललाट पद केलें**,-सदैव-निरंतर नमितां-साष्टांग दंडवत घालितां-अर्थात् त्यांच्या पायांवर मी आपले मस्तक घांसतां, किणे-किण-क्षत-चिन्ह-वण-घट्टा-त्याणें ( ही कर्तरितृतीया ), ललाट-कपाळ-अर्थात् माझें कपाळ, पद केलें-म्हणजे स्थान केले-त्यांस नमस्कार करितां करितां घट्ट्यानें जरी माझें कपाळ आपले राहायाचें ठिकाण केलें-अर्थात् त्यांच्या पायावर मी आपलें कपाळ घासतां घासतां जरी त्या कपाळावर घट्टाहि पडला, या अशा क्षतरूपकार्यवर्णनानें एक तर इतर देवांच्या चरणावर मस्तकारोपात्मक नमनाचें पौन:पुन्यरूप कारण स्पष्ट अनुमित होतें; दुसरें, इतर देवादिकांचें बाहुल्यहि येणेंकरून ध्वनित होते; कारण, क्षतरूप कार्य एकाच देवाच्या चरणावर पुनः पुन: मस्तक घांसल्यानें, अथवा,बहुत देवांच्या चरणावर एकएकदा घांसल्यानेंहि संभवतें; हें दुसरें अनुमान कवीस अधिक विवक्षित असावे असे माझ्या बुद्धीस येतें; तरी कवि भगवंतास म्हणतात-**भवत्पदाब्जाविणें इतर तारिता मज नसे**,-भवत्पदाब्जा विणें-आपल्या चरणकमलाविना इतर-दुसरा कोणीहि देव किंवा मानव तारिता-तारणारा-अर्थात् पूर्वोक्त तापत्रयापासून रक्षायास समर्थ, मज-मला, नसें-नाहीं; तुमच्या चरणकमलाशिवाय दुसरा कोणी मला रक्षणारा नाहीं. त्यांत आणखी या दोन चरणांत किणविधानेंकरून,

---

१ कोट्टारघट्टहट्टाश्चपिंडगोडपिचंडवत् ।
गडु:करंडोलगुडोवरंडश्वकिणोघुणः ॥
—अमर-तृ. कां.

आणि भगवच्चरणास अब्जोपमा दिली येणेंकरून, कवीनी इतरांच्या चरणाचें काठिण्य, आणि भगवच्चरणाचें अत्यंत मृदुत्व, येणेंकरून उद्यमान जी तारतम्यें-करून भगवंताची अत्यंत कोमलहृदयता ती इंगित केली,असे एथें समजलें पाहिजे; तीच पुढें ते स्पष्टार्थाने कथन करितात-नतां मुक्त करुनि ही मीं रिणें बुडालों म्हणसि,-नतां-तुझ्या चरणकमलास जे कोणी नम्र होतात-अर्थात् तुला जे कोणी अनन्यभावेंकरून शरण जातात त्यांस; मुक्त करून ही-तापत्रयापासून सोड-वूनहि-इतकी त्यांजवर उपकृति करूनहि आणखी उलटें-मीं रिणें[1] बुडालों म्हणसि,-मीं तुमच्या ऋणांत बुडालों-तुम्हीं सर्व ऐहिक सुखाचा त्याग करून मला शरण आलां याच तुमच्या महदौदार्यैंकरून मी तुमचा अत्यंत ऋणी झालों असे-म्हणसि-म्हणतोस;[2] हा तुझा केवढा थोरपणा,ही तुझी केवढी सदयता;म्हणून-अशा तुज जो मनुज न भजे,-अशा तुज-अशा अत्यंत दयालु तुज भगवंताला जो मनुज न भजे-जो कोणी मनुष्य भजत नाहीं-सर्वस्वेंकरून जो तुला शरण जात नाही; तयाचें जिणें धिक्-तयाचे-त्या दूषितांतःकरण मानवाचें, जिणे-या सृष्टींत वांचणे, धिक्-धिक्कारयुक्त असो, अर्थात् अशा मनुष्याच्या वांचण्यास धिक्कार असो. एथे भगवद्भक्तीशिवाय वांचणें अत्यंत निंद्य होय असा स्वाभिप्राय कवीनीं दर्शविला आहे.

---

१ एथे ' रीण ' हा केवळ प्राकृत रूढीचा शब्द योजिला आहे.

मजवरित्याचेंफारआहेरीण येवढ्यानेंउत्तीर्णहोईनमी

—नामदेव.

२ जे कोणी अनन्यभावेंकरून मला भजतात, त्याची सर्व काळजी मी वाहतो म्हणून भगवान् गीतेत सांगतात,—

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

—भ. गी. अ. ९, श्लो. २२.